# मग्रंसंठाणे वार्ता

वर्ष १ ले । अंक - १ । फेब्रुवारी २०२४ । पाने -८

संपादक - संजीव फडके, डॉ. निर्मोही फडके

## संपादकीय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे ह्या संस्थेतर्फे 'मग्रंसठाणे वार्ता'चा पहिला डिजिटल अंक सादर करताना आम्हास विशेष आनंद होत आहे.

१८९३ मध्ये स्थापन झालेल्या आपल्या ह्या ग्रंथालयाला १३० वर्षे पूर्ण झाली आहेत. वाचन-संस्कृती वाढावी ह्यासाठी आपली संस्था विविध नावीन्यपूर्ण उपक्रम सतत राबवत असते. कोव्हीडच्या काळात संपूर्ण लॉकडाऊन असतानादेखील आपल्या संस्थेने फेसबुक पेज सुरू करून, त्यावर दर आठवड्याला साहित्यिक विषयांवरील कार्यक्रम प्रसारित करून वाचकांशी नाळ जुळवून ठेवली होती.

आताचे युग हे डिजिटल युग आहे. त्या दृष्टीने विचार करून संस्थेने आपल्याकडील ९००० दुर्मीळ पुस्तकांचे डिजिटायझेशन पूर्ण केले आहे. तसेच सुसज्ज असे इ-ग्रंथालय सुरू केले आहे.

ह्याच परंपरेत आता आम्ही 'मग्रंसठाणे वार्ता'चा डिजिटल अंक सुरू करत आहोत.

आपला हा अंक त्रैमासिक स्वरूपाचा असेल. फेब्रुवारी२०२४ च्या अंकात मागील काही महिन्यांत संस्थेतर्फे झालेल्या विविध कार्यक्रमांचा आणि उपक्रमांचा आढावा घेण्यात आला आहे.

मग्रंसं, ठाणे संस्थेने आधुनिक काळाची गरज ओळखून आणखी एक नवे पाऊल टाकले आहे. आमचे सर्व वाचक-स्नेही 'मग्रंसठाणे वार्ता'चे जोरदार स्वागत करतील असा विश्वास वाटतो. आपल्या प्रतिक्रिया आणि सूचना मनमोकळेपणाने कळवाव्यात ही विनंती.

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे**

स्थापना - १ जून १८९३

**विश्वस्त मंडळ**
(सन २०१८-१९ ते २०२३-२४)

कार्यकारी विश्वस्त
मकरंद प्रभाकर रेगे

विश्वस्त
दामोदर कृष्णाजी सोमण, वासंती विवेक वर्तक, मकरंद विजय जोशी

**व्यवस्थापक मंडळ**
(सन २०२१-२२ ते २०२३-२४)

अध्यक्ष
विद्याधर गजानन ठाणेकर

उपाध्यक्ष
हेमंत दत्तात्रय काणे, अरुण जगन्नाथ म्हात्रे, पद्माकर धोंडो शिरवाडकर, संजीव गंगाधर ब्रह्मे, विकास कमलाकर हजिरनीस

कार्याध्यक्ष
विनायक दत्तात्रय गोखले

कार्यवाह
चांगदेव भीमराज काळे, महादेव ओंकार गायकवाड, संजय जगन्नाथ चुंबळे, दुर्गेश मोहन आकेरकर

**कार्यकारिणी सदस्य**
(सन २०२१-२२ ते २०२३-२४)

सीमा विकास दामले, वृषाली विनोद राजे | डॉ. अश्विनी वरदराज बापट, डॉ. निर्मोही गिरीश फडके | निशिकांत गोवर्धन महांकाळ, नरेंद्र श्रीधर जोशी | संजीव वसंत फडके

निमंत्रित सदस्य
डॉ. संदीप अशोक भावसार, डॉ. राजेश मुरलीधर मढवी, वृंदा कौस्तुभ दाभोलकर, मोहन केशवराव देसाई, महेश श्रीराम राजदेरकर

पदसिद्ध सभासद : मा. ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह : शिरीष रामचंद्र नागले
ग्रंथपाल : वंदना रावजी माने व्यवस्थापक (विश्वस्त मंडळ):

## मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.




मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे या संस्थेची स्थापना १ जून १८९३ रोजी झाली. ब्रिटिश राजवटीतल्या ग्रंथालयात (वाचनालयात) प्रामुख्याने इंग्रजी ग्रंथांचाच भरणा अधिक असे. वृत्तपत्रे व मासिकेही इंग्रजीतच असायची. त्या मानाने मराठी पुस्तकांना दुय्यम स्थान असायचे. किंबहुना ते अगदी अत्यल्पच होते आणि नेमकी हीच उणीव या ग्रंथालयाचे संस्थापक कै.विनायक लक्ष्मण भावे यांना जाणवली. म्हणून त्यांनी व कै. विष्णु भास्कर पटवर्धन यांनी पुढाकार घेऊन, अन्य व्यक्तींच्या साहाय्याने मराठी ग्रंथांना अग्रस्थान असलेले महाराष्ट्रातील पहिलेवहिले ग्रंथालय १ जून १८९३ रोजी स्थापन केले. केवळ मराठी भाषेसाठी स्थापन झालेले हे सार्वजनिक ग्रंथालय, ही भारतातील पहिली संस्था आहे. सध्या ग्रंथालयात पावणेदोन लाख पुस्तकांचा संग्रह आहे. अनेक उपक्रम या संस्थेच्या वतीने आतापर्यंत राबविण्यात आले आहेत. यात तीन वेळा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनाचा समावेश आहे.

संस्थेच्या ठाण्यात दोन शाखा आहेत. तसेच ठाणे शहराचा वाढता पसारा लक्षात घेउन लांब अंतरावरील वाचकांसाठी फिरते ग्रंथालयही सुरू केले आहे. या ग्रंथयानला वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. सध्या ग्रंथयान ३५ ठिकाणी सेवा देत आहे. भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार हा भारतीय भाषांमधील साहित्यसेवेबद्दल साहित्यिकांना देण्यात येणारा सर्वोच्च पुरस्कार आहे. आत्तापर्यंत जे मान्यवर भारतीय साहित्यिक ह्या पुरस्काराने सन्मानित झाले आहेत, अशा साहित्यिकांच्या साहित्याविषयीच्या दालनाची तयारी ग्रंथालयात सुरू झाली आहे. देशातील सार्वजनिक ग्रंथालयात निर्माण होणारे असे हे पहिलेच 'ज्ञानपीठ दालन' आहे.

संस्थेच्या सरस्वती मंदिर या इमारतीत पाचव्या मजल्यावर सुसज्ज अभ्यासिका सुरु आहे. सुमारे १०० अभ्यासक या अभ्यासिकेचा लाभ घेत असतात.

# ज्युलियन आणि ग्रेगोरियन

✍ **दा. कृ. सोमण**

‘‘ भारतात आपण  इसवी सन १७५२ पूर्वीच्या आपल्या ऐतिहासिक सर्व थोर पुरुषांचे जन्मदिन व स्मृतिदिन सध्या चालू इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे चुकीच्या दिवशी पाळत असतो ! ‘‘असे कुणी तुम्हाला सांगितले तर प्रथम तुमचा विश्वास बसणार नाही ! पण ही खरी वस्तुस्थिती आहे. कारण हे सर्व थोर पुरुष होऊन गेले त्यावेळी ज्युलियन कालगणनेप्रमाणे तारखांचे दिवस होते. सध्या आपण इंग्रजी ग्रेगोरीयन तारखांच्या दिवशी ते साजरे करतो. ज्युलियन व ग्रेगोरियन तारखांमध्ये दहा - अकरा दिवसांचा फरक आहे. संत-महंतांच्या जयंती-पुण्यतिथीचे दिवस मात्र पंचांगातील तिथीप्रमाणे जे पाळतो ते मात्र बरोबर पाळत असतो. आज आपण या लेखात इंग्रजी तारखेप्रमाणे चुकीच्या दिवशी जन्मदिन व स्मृतिदिन कसे पाळत आलेलो आहोत ते समजून घेणार आहोत. म्हणजेच ज्युलियन व ग्रेगोरियन कालगणनेविषयी माहिती करून घेणार आहोत. खरं म्हटलं तर इतिहासकारांनी थोर व्यक्तींच्या जन्म दिवसांच्या व निधनाच्या या तारखा ठरवितांना ज्युलियन कालगणना आणि ग्रेगोरियन कालगणना विचारातच घेतली नाही. त्यामुळे हे असे झाले आहे. ज्युलियन कॅलेंडरप्रमाणे असणारे ते दिवस सध्या वापरात असलेल्या इंग्रजी म्हणजे ग्रेगोरियन कॅलेंडरप्रमाणे बदलून घ्यावयास हवे होते.

आपल्या प्रमाणेच आज जगाच्या बहुतेक सर्व ग्रेगोरियन कालगणनाच प्रचारात आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारातही ग्रेगोरियन कालगणनाच वापरली जात आहे. या कालगणनेप्रमाणे असलेल्या तारखेला आपण ‘इंग्रजी तारीख’ असेही म्हणतो. आपण आज ही कालगणना कधी व कशी वापरण्यात येऊ लागली व त्यात बदल कसे व का होत गेले ते पाहणार आहोत.

कालगणनेतील सुधारणा सध्या आपण इंग्रजी तारीख- सन म्हणून सांगतो त्या कालगणनेचा प्रारंभ इसवी सनाचे पूर्वी ४५ वे ज्युलियस सीझर याने केला. ही कालगणना सौर पद्धतीवर आधारित असल्यामुळे वर्षाचे दिवस ३६५ धरावे व दर चौथ्या वर्षी १ दिवस जास्त ‘लीप वर्ष’ म्हणून धरावा असे ठरविण्यात आले. पण इसवी सनापूर्वी ४५ वे वर्षी जानेवारीची पहिली तारीख निश्चित करताना त्यापूर्वी जो घोटाळा झाला तो दूर करण्यासाठी इसवी सनापूर्वीचे ४६ वे वर्ष ४४५ मानण्याचा कायदा त्याला करावा लागला होता.

पुढे ज्युलियस सीझरची पद्धती चालू झाल्यावर त्या पद्धतीने दर चौथ्या वर्षी लीप वर्षाचा एक दिवस ( फेब्रुवारीत २८ दिवसांऐवजी २९ दिवस) जास्त धरल्यामुळे वास्तविक मानापेक्षा सुमारे ४५ मिनिटे जास्त धरली जाऊ लागली. असे होता होता सोळावे शतक पुरे होत आले तोपर्यंत अशा रितीने सुमारे १० दिवस जास्त मानले जाऊ लागले. ‘ज्यूलियन’ कालगणनेतील ही चूक तशी मोठी होती.




त्यानंतर ही चूक दुरुस्त करावी म्हणून काही वर्षांनंतर तेरावा ग्रेगरी या नावाच्या पोपने एक नवीन युक्ती शोधून काढली. त्याच्या या युक्तीप्रमाणे पूर्वीच्या लीप वर्षाच्या नियमात असा बदल करण्यात आला की, सनाच्या शतकपूर्तीचा आकडा जरी चारांनी भागिला गेला, तरी त्यावर्षी लीप वर्ष मानू नये. सनाच्या शतकपूर्तीच्या अंकास जर ४०० नी भाग गेला तरच ते लीप वर्ष म्हणून समजावे.

पण त्यापूर्वी ज्युलियस सीझरच्या कालगणनेत जो घोटाळा झाला होता व १० दिवस जास्त धरले गेले होते ते कमी करण्यासाठी सन १५८२ साली ५ ऑक्टोबर तारखेला १५ ऑक्टोबर मानला जावा असा नियम तेरावा ग्रेगरी पोप यानी केला.त्यामुळे जास्त झालेले १० दिवस त्याने मागे आणले. ही सुधारणा केलेली कालगणना ‘ग्रेगोरियन’ कालगणना म्हणून ओळखली जाऊ लागली. तीच पद्धत सध्या वापरली जात असते. परंतु ग्रेगोरियन कालगणनेतील ही १० दिवस मागे आणण्याची सुधारणा जगातील सर्वच देशानी एकदम स्वीकारली नाही. स्पेन, पोलंड, फ्रान्स, बेल्जियम या देशानी सन १५८२ दहा दिवस वाढवून ही सुधारणा स्वीकारली. इंग्लंड व इंग्रजांचे राज्य ज्या ठिकाणी होते त्या ठिकाणी सन १७५२ मध्ये ११ दिवस वाढवून ही सुधारणा स्वीकारली. ज्युलियन मधून ग्रेगोरियन म्हणजेच इंग्रजी तारखांमध्ये बदल करण्यासाठी १५ ऑक्टोबर १५८२ ते

२८ फेब्रुवारी १७०० या कालासाठी १० दिवस वाढवावे लागले होते.
१ मार्च १७०० ते ३ सप्टेंबर१७५२ या कालासाठी ११ दिवस वाढवावे लागले होते.

त्यामुळे भारतातही सन १७५२ मध्ये ११ दिवस वाढवून ग्रेगोरियन म्हणजेच इंग्रजी कॅलेंडरमध्ये ही सुधारणा स्वीकारली गेली. त्यामुळे ब्रिटीश कॅलेंडरमध्ये २ सप्टेंबर १७५२ च्या पुढच्या दिवशी १४ सप्टेंबर १७५२ ही तारीख दाखविण्यात आली होती.

म्हणून तारखे प्रमाणे दिवस पाळताना सन १७५२ पूर्वीच्या सर्वच ज्युलियन तारखांमध्ये ११ दिवस वाढवून सध्याच्या इंग्रजी तारखांमध्ये रूपांतर करण्याची खरी गरज आहे. असे केले तरच थोर पुरुषांच्या जन्मदिवस किंवा मृत्यू दिवस ठीक त्याच दिवशी पाळले असे होईल.

पान नं ३ वर

पान नं २ वरुन

## ज्युलियन आणि ग्रेगोरियन

वास्तविक इतिहासकारांनी इतिहास लिहितांना सन १७५२ च्या पूर्वीच्या तारखांच्या दिवसात ११ दिवस मिळवून त्या तारखांची नोंद इतिहासांत करण्याची आवश्यकता होती. परंतु दुर्दैवाने इतिहासातील तारखांची नोंद करतांना इतिहासकारांनी ज्यूलियन तारखा ग्रेगोरियन ( इंग्रजी ) तारखात बदलून नोंद केली नाही. त्यामुळे सन १७५२ पूर्वीच्या सर्वच थोरपुरुषांचे जन्मदिवस चुकीच्या दिवशी म्हणजे ११ दिवस अगोदरच आपण साजरे करीत असतो.

अजूनही भारत सरकारला इतिहासातील या सर्व दिवसांच्या तारखात बदल करून ( म्हणजे ११ दिवस वाढवून ) ही सुधारणा करता येईल. नाहीतर आपण थोर पुरुषांची जयंती तारखे प्रमाणे साजरी करतांना ती ११ दिवस आधीच म्हणजे चुकीच्या दिवशीच साजरी करीत राहू.

ब्रिटीश कॅलेंडरमधील सप्टेंबर १७५२ महिना असा होता.

( बुधवारी २ तारखेनंतर गुरुवारी एकदम १४ तारीख होती)

| SEPTEMBER | १७५२ | | |
|---|---|---|---|
| SUN. | | १७ | २४ |
| MON. | | १८ | २५ |
| TUE. | १ | १९ | २६ |
| WED. | २ | २० | २७ |
| THU. | १४ | २१ | २८ |
| FRI. | १५ | २२ | २९ |
| SAT. | १६ | २३ | ३० |

ग्रेगोरियन आणि संपातीय वर्ष

ऋतू आणि वर्ष यांची सांगड घालणे महत्त्वाचे असते. यासाठी वर्षमान बरोबर असावे लागते.

ग्रेगोरियन वर्ष ३६५ दिवस ५ तास ४९ मिनिटे व १२ सेकंदाचे ( ३६५.२४२५ दिवसांचे ) असते.

संपातीय वर्ष ३६५ दिवस ५ तास ४८ सेकंदाचे ( ३६५. २४२२ दिवसांचे ) असते.

ऋतू हे संपातीय वर्षावर अवलंबून असतात. ग्रेगोरियन आणि संपातीय वर्ष यामध्ये

सध्याही २६ सेकंदांचा म्हणजेच ०.०००३ दिवसांचा फरक शिल्लक राहतोच. त्यामुळे ३००० वर्षानी ग्रेगोरियन आणि संपातीय वर्षात १ दिवसाचा फरक पडणारच आहे.

✍ दा. कृ. सोमण

## श्रीस्थानक पुरस्कार सन २०२२



श्रीस्थानक पुरस्कार वितरण सुप्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक मा. श्री. रंगनाथ पठारे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

### पुरस्कार विजेते

**चरित्र/आत्मचरित्र**
लेखक: पोपट श्रीराम
पुस्तक: काजवा परिवर्तनशील कुलगुरू
प्रकाशक: मनोविकास प्रकाशन, पुणे

**इतिहास**
लेखक: सुहास बहुलकर
पुस्तक: द बॉम्बे रिव्हायव्हलिस्ट स्कूल
प्रकाशक: राजहंस प्रकाशन, पुणे

**कादंबरी**
लेखक: लक्ष्मीकांत देशमुख
पुस्तक: वेदनेचा क्रूस
प्रकाशक: मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई

**समीक्षा/संशोधन**
लेखक: नीतिन वैद्य
पुस्तक: जवळिकीची सरोवरे
प्रकाशक: डिंपल पब्लिकेशन्स, भाईंदर

**कथा**
लेखक: सागर कुलकर्णी
पुस्तक: अर्ध्या माणसाची अर्धी गोष्ट
प्रकाशक: राजेंद्र प्रकाशन, मुंबई

**विज्ञान**
लेखक: विद्यानंद रानडे
पुस्तक: पाण्या तुझा रंग कसा ?
प्रकाशक: राजहंस प्रकाशन, पुणे

**कविता**
कवी: राजीव लक्ष्मण जोशी
पुस्तक: शतकोत्तरी ओरखडा
प्रकाशक: वर्णमुद्रा पब्लिशर्स, बुलढाणा

**विनोद**
लेखक: सॅबी परेरा
पुस्तक: तिरकस चौकस
प्रकाशक: ग्रंथाली प्रकाशन, मुंबई

**अनुवाद**
अनुवादक : चंद्रकांत भोंजाळ
पुस्तक: कथायात्रा खंड-१ (निवडक हिंदी कथा)
प्रकाशक: अनघा प्रकाशन, ठाणे

**बालसाहित्य**
लेखक: सुयश यशवंत देशपांडे
पुस्तक: पयोधरीचा निसर्गप्रेमी अभ्र
प्रकाशक: जे. के. मिडिया, ठाणे

**प्रवास**
लेखक: राज वसंत शिंगे
पुस्तक: झोरीचा आणि सर्बिया
प्रकाशक: सृजनसंवाद प्रकाशन, ठाणे

**निबंध/संकीर्ण**
लेखिका: वृषाली मगदूम
पुस्तक: जिणं शोषितांचं
प्रकाशक: ग्रंथाली प्रकाशन, मुंबई

**पर्यावरण**
लेखक: अतुल देऊळगावकर
पुस्तक: पृथ्वीचं आख्यान
प्रकाशक: राजहंस प्रकाशन, पुणे

**नाटक**
लेखक: जयेश शत्रुघ्न मेस्त्री
पुस्तक: एल्गार
प्रकाशक: सप्तश्री प्रकाशन, सोलापूर

# मग्रंसंचे नव्या युगात पाऊल....
# डिजिटल ग्रंथालय, डिजिटल लॅब सुरू!!

आजच्या डिजिटल युगात जग बदलत्या गतीने धावत आहे. या बदलत्या युगात तरुणांचे जीवनही जलद गतीने बदलत आहे. या बदलत्या जगात टिकून राहण्यासाठी आणि यशस्वी होण्यासाठी तरुणांना विविध संधी आणि साधनं उपलब्ध असणे गरजेचे आहे. याच गरजेतून निर्माण झाली आहे मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे येथील डिजिटल लॅब सेवा. ही सेवा केवळ एक सुविधा नसून, आजच्या युवा पिढीच्या गतीशील जीवनाला दिशा देणारा मार्गदर्शक आहे.

**१. माहितीच्या महासागरात मार्गदर्शन :**

आजच्या जगात माहिती ही सर्वांगाला व्यापून असलेली शक्ती आहे. इंटरनेटच्या माध्यमातून माहितीचा अफाट सागरातून योग्य अचूक माहिती शोधणे हे एक मोठे आव्हान आहे. या आव्हानावर मात करण्यासाठी डिजिटल लॅब ही तरुणांना मदत करते. स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण, नोकरी, कौशल्य विकास किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी आवश्यक असलेली अद्ययावत आणि विश्वासार्ह माहिती या लॅबमध्ये सुलभतेने उपलब्ध करून दिली आहे. यात प्रसिद्ध प्रकाशनांची ई-पुस्तके, प्रतिष्ठित वृत्तपत्रांची ऑनलाइन आवृत्ती, स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठीचे अभ्याससाधन, कौशल्य विकासाचे ऑनलाइन कोर्स आणि इतर विविध माहितीपूर्ण संसाधने समाविष्ट आहेत. यामुळे तरुणांना नको त्या माहितीच्या चक्रव्यूहात न अडकता योग्य दिशा आणि माहिती मिळू शकते.

**२. कौशल्य विकासाचे पाऊल :**

आजच्या जागतिक स्पर्धेत केवळ पदविका किंवा ज्ञान पुरे नाही, तर विशिष्ट कौशल्येही यशासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. डिजिटल लॅब ही तरुणांना विविध कौशल्ये विकसित करण्याची संधी देते. यात संगणक साक्षरता, डिजिटल मार्केटिंग, ग्राफिक डिझायनिंग, वेब डेव्हलपमेंट, आणि संवाद कौशल्ये यासारख्या विविध विषयांवर ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध आहेत. या कार्यक्रमांद्वारे तरुणांना आजच्या स्पर्धात्मक बाजारपेठेत स्वत:ला सिद्ध करण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करता येतात. यामुळे त्यांच्या नोकरीच्या संधी वाढतात आणि स्वतंत्र व्यवसाय करण्याचाही आत्मविश्वास निर्माण होतो.

**३. स्पर्धा परीक्षांची तयारी :**

भारतात दरवर्षी लाखो विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षा देतात. या परीक्षांसाठी तयारी करणे हे एक आव्हानात्मक काम आहे. परंतु, डिजिटल लॅबमुळे या तयारीला एक नवीन दिशा मिळेल. या लॅबमध्ये स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करणारे उच्च दर्जाचे ई-बुक, मॉक टेस्ट, तज्ञांचे



२४ डिसेंबर २०२३ रोजी या इ-ग्रंथालय व डिजिटल अभ्यासिकेचा उद्घाटन सोहळा ज्येष्ठ कवी प्रविण दवणे यांच्या शुभहस्ते झाला. याप्रसंगी जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री. प्रशांत पाटील व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

ऑनलाइन मार्गदर्शन आणि विविध शंकांवर सोडवणूक देणारे चर्चासत्र उपलब्ध आहेत. या साधनांच्या साहाय्याने विद्यार्थी आपल्या अभ्यासाची दिशा निश्चित करू शकतात, वेळेचे नियोजन करू शकतात आणि प्रश्नांची सराव करू शकतात.

महाराष्ट्र सरकारने २० लाख रुपये अनुदान देऊन मराठी ग्रंथ संग्रहालयात डिजिटल लॅब हा महत्त्वकांशी प्रकल्प उभारला आहे. या प्रकल्पा अंतर्गत शासनाने ५ संगणक, १ प्रिंटर, १ प्रोजेक्टर, १ मोठी स्क्रीन, फर्निचर मध्ये टेबल खुर्च्या, संगणकाला लागणारा बॅटरी बॅकअप आणि इंटरनेट सुविधा तसेच CCTV कॅमेरा दिलेला आहे. मराठी ग्रंथ संग्रहालयाने वाचकांची भविष्यातील गरज ओळखून नौपाडा शाखेत २०० चौरस फूट जागा या प्रकल्पासाठी दिली आहे.

**या डिजिटल लॅबमध्ये खालील सुविधा उपलब्ध आहेत :**



५ संगणक, १ प्रिंटर, १ प्रोजेक्टर, १ मोठी स्क्रीन, ५ टेबल, २५ खुर्च्या, बॅटरी बॅकअप, इंटरनेट सुविधा, CCTV कॅमेरा

**या डिजिटल लॅबमध्ये खालील सेवा उपलब्ध आहेत :**

ई-पुस्तके - १००० स्पर्धा परीक्षा तयारी

ई-वर्तमानपत्रे - magzter Database

ई-मासिके- magzter Database

**व्यावहारिक सत्र**

शासनाची अपेक्षा आहे की, ग्रंथालयाने तरुणांना कौशल्य विकासात, नोकरी मिळवण्यात तसेच ज्ञान आज्ञावत करण्यास मदत करू शकतील अशी व्यावहारिक सत्र आयोजित करावेत. मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे आपल्या सभासदांसाठी, एक पाऊल पुढे हे ब्रीद वाक्य समोर ठेवून अधिकाधिक आधुनिक सेवा देत आहे.

✍ डॉ. संदीप भावसार

## जी.ए. कुलकर्णी जन्मशताब्दी कार्यक्रम



मराठी साहित्यामध्ये आपल्या लेखणीने स्वत:चे एक वेगळे स्थान निर्माण केलेले ख्यातनाम साहित्यिक जी.ए. कुलकर्णी ह्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त ग्रंथालयाने दोन कार्यक्रम आयोजित केले होते. त्यांच्या जन्मशताब्दीचा आरंभ 'जीए आणि त्यांचे साहित्य' ह्या विषयावरील जीए साहित्यप्रेमींच्या चर्चेने वाचन कट्टयावर करण्यात आला. जीए ह्यांच्या भगिनी आदरणीय नंदा पैठणकर ह्यांच्या उपस्थितीत, त्यांनी जीए ह्यांना लिहिलेल्या पत्रांच्या अभिवाचनाने जन्मशताब्दी वर्षाची सांगता झाली. सुप्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी ह्यांनी ह्या पत्रांचे अतिशय भावपूर्ण अभिवाचन केले. ग्रंथालय कार्याध्यक्ष श्री. विनायक गोखले ह्यांच्या पुढाकाराने संपन्न झालेल्या ह्या कार्यक्रमांमध्ये ह्या निमित्ताने जी.ए. कुलकर्णी ह्यांच्या साहित्याचा जागर ग्रंथालयात केला गेला.



## शालेय विद्यार्थ्यांची ग्रंथालयाला भेट...

शालेय विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची माहिती व्हावी व वाचनाची गोडी लागावी यासाठी एक अभिनव उपक्रम आपण राबवत आहोत. यासाठी शालेय विद्यार्थ्यांची ग्रंथालयाला भेट आयोजित करत असतो. १२ डिसेंबर २०२३ रोजी ठाणे पूर्व येथील नाखवा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाला भेट दिली. त्यावेळी त्यांचे शिक्षकही सोबत होते. ग्रंथालयात येण्याची ही त्यांची पहिलीच वेळ होती. त्यामुळे आत येताच एवढ्या मोठ्या संख्येने पुस्तके पाहून सर्व मुले भारावून गेली. त्यांना सर्व पुस्तके पाहण्यास व हाताळण्यास खूप छान वाटले. एवढी पुस्तके पाहून नेमकं कोणतं पुस्तक वाचावे असा संभ्रम पडला. लगेच सर्व मुले पुस्तके वाचता वाचता अनोख्या विश्वात हरवून गेली होती. त्यांच्या सोबत आलेल्या शिक्षकांची देखील अशीच अवस्था झाली होती. ग्रंथालयातील सेवकांनी त्यांना माहिती सांगून त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.





## ग्रंथयान (फिरते वाचनालय)

गेल्या काही वर्षांत ठाणे शहर झपाट्याने विस्तारित होत आहे. शहराच्या या विस्तारीत भागात राहणाऱ्या वाचन प्रेमींसाठी ग्रंथयान या फिरत्या वाचनालयाची योजना आपण केली त्याला ५ वर्षे पूर्ण झाली आहेत. ग्रंथयानला वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभत आहे. सध्या ग्रंथयान ३ ३ ठिकाणी सेवा देत आहे.

### ग्रंथयान चे वेळापत्रक



मराठी ग्रंथ संग्रहालय,ठाणे
ग्रंथयान वेळापत्रक भ्रमणध्वनी क्र. ८६९३८०६७२७

| वार | १२.३० ते २ | २.३० ते ३.१५ | ३.३० ते ४.१५ | ४.३० ते ५.१५ | ५.३० ते ६.४५ | ७.०० ते ८.०० |
|---|---|---|---|---|---|---|
| मंगळवार | हरिओम नगर , ठाणे पूर्व कोपरी | रघुनाथ नगर , तीन हात नाका | | कशिश पार्क, चेकनाका | मेंटल हॉस्पिटल | श्री गजानन महाराज मठ शिवाई नगर |
| बुधवार | कचराळी तलाव | लुईस वाडी | | लोकमान्य नगर | वसंत विहार | वर्तक नगर |
| गुरुवार | प्रेस्टीज रेसिडेन्सी, घोडबंदर | ब्रम्हांड २ | | हिरानंदानी ई. पातलीपाडा | ऋतू इन्क्लेव्ह | रुणवाल इस्टेट , मानपाडा |
| शुक्रवार | ग्रंथयान कामे | जिल्हाधिकारी कार्यालय | हॅपी व्हॅली , मानपाडा | गार्डन इस्टेट | घाणेकर नाट्यगृह पवार नगर | कॅसल मिल |
| शनिवार | शिवाई नगर | गावंड बाग | वसंत लॉन्स | दादलानी पार्क | ९०फुटी रस्ता खारेगांव | ओझेन व्हॅली |
| रविवार | वृंदावन | लोढा कॉम्प्लेक्स , माजीवाडा | प्राईड पाम्स कोलशेत | सोहम गार्डन .मानपाडा | ऋतू इस्टेट पातलीपाडा | वाघबीळ टी.जे.एस.बी.बँक |

# ‘वाचन आणि कवी कट्टा’

वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी, तसेच जास्तीत जास्त वाचकांनी ग्रंथालयाचे सभासदत्व घ्यावे ह्या हेतूने मराठी ग्रंथ संग्रहालयाने जानेवारी २०२३मध्ये वाचन कट्टा, तर मार्च २०२३ मध्ये कवी कट्ट्याची सुरुवात झाली. ह्या कट्ट्यावर रसिक वाचक, श्रोते, लेखक, कवी, प्रकाशक इत्यादींचा संवाद घडावा, अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले गेले. वाचन कट्ट्याचा आरंभ ज्येष्ठ कलाकार श्री. जयंत सावरकर ह्यांच्या मुलाखतीपासून झाला. कवी कट्ट्याची सुरुवात ज्येष्ठ कवी श्री. अशोक बागवे आणि श्री. अरुण म्हात्रे ह्यांच्या कवितावाचनाने झाली.

वाचनकट्ट्यावर अनेक कलाकार, लेखक, पत्रकार ह्यांनी अनेक कथांचं, लेखांचं अभिवाचन केलंच, पण त्यांच्या मुलाखतीतून त्यांचा वाचनप्रवासही उलगडला.

विशाखा सुभेदार, अभिजित चव्हाण, सचिन मोटे, श्रीकांत बोजेवार, डॉ. मुकुंद कुळे अशा अनेकांनी वाचनकट्ट्याची शान वाढवली आहे.

कवी कट्ट्यावरदेखील अनेक मान्यवर कवींनी आपल्या कविता सादर करून श्रोत्यांना कवितेच्या प्रदेशात रममाण केले. कवी सतीश मोघे, कॅप्टन वैभव दळवी, डॉ. संतोष पाठारे, विजयराज बोधनकर, गायक -संगीतकार मिलिंद जोशी, रामदास खरे, गीतेश शिंदे, सुजाता राऊत इत्यादींच्या कविता, गप्पांनी कवी कट्टा सजला.

वाचन संस्कृती रुजावी, वाढावी ह्यासाठी मराठी ग्रंथ संग्रहालय कायमच प्रयत्नशील असल्याचे द्योतक म्हणजे, ह्या कार्यक्रमांकरता सातत्याने वाढणारी रसिक प्रेक्षकांची उपस्थिती, तसेच अनेक साहित्यिकांना ह्या कट्ट्यावर येऊन वाचकांशी संवाद साधण्याची मनापासून वाटणारी इच्छा.









# शारदोत्सव २०२३



## साहित्यिक गप्पा

डॉ. निर्मोही फडके, विशाखा विश्वनाथ, किरण येले




## वर्दी मधले दर्दी

दिपक कांबळी, विनय शिर्के, किरण वालावलकर

### महत्त्वकांक्षी प्रकल्प

## ज्ञानपीठ पुरस्कार दालन....

आपल्या संस्थेने आता आणखीन एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या साहित्यिकांच्या साहित्यकृतींचे स्वतंत्र दालन निर्माण करण्याचे योजले आहे. १९६५ सालापासून ज्ञानपीठ पुरस्कार हा सर्वोच्च साहित्य पुरस्कार देण्यात येत आहे. आजवर भारतातील विविध भाषांमधील ६२ साहित्यिकांना हा सन्मान प्राप्त झाला आहे. त्यात मराठी भाषेतील चार लेखकांचा समावेश आहे. या सर्व साहित्यिकांच्या साहित्याचे एक स्वतंत्र दालन मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे येथे सुरु करण्यात येत आहे.

**उद्देश :** ज्ञानपीठ हा साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार आहे. अशा पुरस्कार विजेत्या साहित्यिकांचे सर्व साहित्य आपल्या संग्रहालयात असावे. साहित्यिक, साहित्य संशोधक व रसिक वाचक यांना भारतीय स्तरावरील या पुरस्कार प्राप्त साहित्यिक व त्यांच्या साहित्याचा अभ्यास, संशोधन, वाचन यांचा लाभ एकत्रितरित्या एकाच छताखाली व्हावा. मूळ भाषेत असलेले साहित्य अनुवाद स्वरुपात उपलब्ध करून देण्यासाठी अनुवादकांना येथे सोय उपलब्ध करून द्यावी. शक्य झाल्यास अशा अनुवादकांना आमंत्रित करून अनुवाद करण्यासाठी विशेष प्रोत्साहन योजना अमलात आणणे. मराठी सोबतच अन्य भाषेतील साहित्याचा परिचय करून देण्यात यावा.

अभ्यासक, वाचक, संशोधक यांना हे साहित्य मराठी ग्रंथ संग्रहालयातच हाताळता येईल. या ठिकाणी पुस्तकांची मांडणी आकर्षकरित्या राहील, याची काळजी घेण्यात येईल. अभ्यासकांना येथे बसून अभ्यास, वाचन, संशोधन करण्यासाठी टेबल, खुर्ची, दिवा, पंखा, संगणक आदी सोयी नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात येतील.

**स्वरूप :** ज्या भाषेतील साहित्यिकांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेला आहे, त्या साहित्यिकांचे त्यांच्या मूळ भाषेतील त्यांनी लिहिलेले संपूर्ण साहित्य एकत्रित करणे. मूळ भाषेतील साहित्याचे इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेत झालेले अनुवाद एकत्रित करणे. अन्य साहित्यिकांनी लेखकांनी या ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या साहित्यिक वा त्यांच्या साहित्यावर लिहिलेले सर्व साहित्य एकत्रित करणे. मूळ भाषेत लिहिलेल्या लेखकाच्या अप्रकाशित, प्रकाशित परंतु असंकलित साहित्य, हस्तलिखित अशा स्वरूपाचे जे साहित्य उपलब्ध होऊ शकेल त्यांचे संकलन करणे.

भारतात अशा तऱ्हेचा हा पहिलाच नाविन्यपूर्ण उपक्रम आहे. आजवरच्या आमच्या उपक्रमांचे जसे आपण स्वागत केले तसेच या ही योजनेचे कराल ही खात्री आहे.

✍ **चांगदेव काळे**
कार्यवाह




**भारतीय भाषा दिवस निमित्त ग्रंथयान जिल्हाधिकारी कार्यालयात**

## वाचन प्रेरणा दिन

दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती दिनी साजरा केला जातो. या अंतर्गत १५ ऑक्टोबर २०२३ रोजी आपल्या संस्थेने वाचकांसाठी अभिवाचन कार्यक्रम आयोजित केला होता. वाचकांचा ऊत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.

यात २५ वाचकांनी सहभाग घेतला होता. कविता, कथा, लेख इत्यादी साहित्य प्रकाराचे अभिवाचन केले गेले.





# मग्रंसंठाणे वार्ता


वर्ष १ ले । अंक - १ । फेब्रुवारी २०२४ । पाने -८

संपादक - संजीव फडके, डॉ. निर्मोही फडके


## सरस्वती मंदिर (मुख्य शाखा)



## सरस्वती मंदिर (अभ्यासिका)



## शारदा मंदिर (नौपाडा शाखा)



## शारदा मंदिर (डिजिटल लॅब)



**मुख्य शाखा** सरस्वती मंदिर, जिल्हा परिषदेसमोर, नेताजी सुभाष पथ, ठाणे- ४००६०१

**नौपाडा शाखा** शारदा मंदिर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे- ४००६०१

सरस्वती मंदिर (मुख्य कार्यालय) - भ्रमणध्वनी :९७६८२ ५७५७५ | संदर्भ - भ्रमणध्वनी : ८७७९६ ९६७९६

शारदा मंदिर (नौपाडा केंद्र) -भ्रमणध्वनी : ९३२६६ ६७४७० | ग्रंथयान - भ्रमणध्वनी : ८६९३८ ०६७२७

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

नोंदणी क्र. एफ.४ - ठाणे

(सरकारमान्य 'अ' वर्ग ठाणे जिल्हा मुक्तव्दार सार्वजनिक वाचनालय)

सरस्वती मंदिर, दुसरा मजला, जिल्हा परिषदेसमोर, नेताजी सुभाष पथ, ठाणे- ४००६०१

### देवघेव विभाग

९७६८२ ५७५७५
२५४०६७८७

२ रा मजला, वेळ - सकाळी ८ ते रात्रौ ८ पर्यंत, साप्ताहिक सुट्टी - सोमवार

### संदर्भ विभाग

८७७९६ ९६७९६

अभ्यासिका, ५वा मजला, वेळ - सकाळी ८ ते रात्रौ ८ पर्यंत, साप्ताहिक सुट्टी - रविवार

### मुक्तव्दार विभाग

तळ मजला, वेळ - सकाळी ९ ते दुपारी १ व सायंकाळी ४ ते रात्रौ ८ पर्यंत

### ग्रंथयान (फिरते वाचनालय)

८६९३८ ०६७२७

वेळ - दुपारी १२ ते रात्रौ ८ पर्यंत, साप्ताहिक सुट्टी - सोमवार

### सभासद प्रकार

१) आश्रयदाते रु. १०,०००/- एक रक्कमी
२) आजीव सभासद रु. ५,०००/- एक रक्कमी
३) अनामत रु. ५००/- प्रत्येकी एक पुस्तकास
४) प्रवेश शुल्क रु. ५०/-
५) पुस्तक शाखा वर्गणी व्दिमाही रु. १५०/-
६) मासिक शाखा वर्गणी व्दिमाही रु. ५०/-
७) बाल वाङ्मय वर्गणी व्दिमाही रु. २०/-